नि.फौ. केस क्र.६४/२०२१
निशाणी क्र. ३१

**सरकारतर्फे साक्षीदार क्र.०१ यांची जबानी.**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की –

माझे नांव – गणेश भगवान मुजमुले

वय सुमारे – ३४ वर्षे व्यवसाय – शेती

निवासस्थान – पिंपळगाव सराई ता. जि. – बुलडाणा

**सरतपासणी सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचेकडून**

०१. मी आरोपींना ओळखत नाही. पोलिसांनी मला घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा करण्यासाठी बोलविले होते. मी रस्त्याने चाललो होतो. पोलिसांनी मला सही करण्यास सांगितले मी सही केली. आता मला अभिलेखावरील घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यात काय मजकुर लिहीलेला आहे मला माहित नाही. त्यावर माझी सही आहे. **सहीस निशाणी क्र. ३२** देण्यात येत आहे.

**(सदर साक्षीदार अभियोग पक्षाला पूरक साक्ष देत नसल्याने त्यांना उत्तर सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी सरकारी विधिज्ञांनी मागीतली ती देण्यात आली.**

**उत्तर सुचक प्रश्न सरकारी वकील श्रीमती आर.एस. जाधव यांचे तर्फे**

०२. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या गावात विजय तरमळे यांचे किराणा दुकान आहे. हे म्हणणे खरे नाही की, दि. २२.११.२०१९ रोजी त्या दुकानात ज्ञानेश्वर सोनवणे आले होते. त्यावेळी आरोपी विजय तरमळे यांचे भाऊजय गिता तरमळे दुकानात हजर होते. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष आरोपी विजय तरमळे यांच्या दुकानाची झडती घेतली असता दर्शनी भागामध्ये उंट बिडी १५ याचे १४ बंडलचे नकली पुडे अंदाजे किमत ५२६४/- रुपयाचा माल मिळून आला. हे म्हणणे खरे नाही की, सदरचा माल जप्ती कामी पंचा समक्ष ताब्यात घेण्यात आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्या समक्ष घटनास्थळ तथा जप्ती पंचनामा तयार केला व मी तो वाचून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझी चौकशी केली होती.

०३.  आता मला माझ्या बयानातील अधोरेखांकित भाग 'अ' वाचून दाखवीण्यात आला सदरचा मजकुर मी पोलिसांना सांगितला नव्हता. सदरचा मजकुर माझ्या बयानात पोलिसांनी का नमुद केला याचे कारण मला सांगता येणार नाही. आरोपी माझ्या गावातील आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आणि माझे चांगले संबध आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या गावातील असल्यामुळे त्यांना वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उत्तरसुचक प्रश्न - संपले.

**उलटतपास आरोपी क्र. १ चे विधिज्ञ श्री. गफफार शेख यांनी नाकारला.**
**उलटतपास आरोपी क्र. २ चे विधिज्ञ श्री. एस.एम. शेख यांनी नाकारला.**

उलटतपास नाकारला.
फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्विकृत,

Digitally signed by SMITA HARIDAS UKEY
Date: 2025.11.06 14:55:38 +0530

( श्रीमती एस.एच.उके )
दि.०५.११.२०२५  न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, चिखली